महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र.मु.अ.(वा)/लेखा/ग्रां.प.दिवाबत्ती/५५/२००८-०९/ - 9300** **दिनांक : 30 MAR 2009**

**परिपत्रक क्र. 96**

**विषय :- ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. २८,६८,९०,०००/- (रुपये अठ्ठावीस कोटी अडुसष्ट लक्ष नव्वद हजार फक्त)**

**संदर्भ :-** १. शासन निर्णय क्र.बीजीटी २६०८/प्र.क्र.४४९८/पंरा-४(२२) दि.१३ मार्च २००९.
२. शासन निर्णय क्र.बीजीटी २६०८/प्र.क्र.४४९८/पंरा-४(२२) दि.२० डिसेंबर २००८.

--------------

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची देयके भागविण्यासाठी शासन १०० टक्के अनुदान देते. सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची वीज देयकाकरिता रुपये ८२,०९,७४,०००/- (रुपये ब्याऐंशी कोटी नऊ लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त) इतक्या रकमेचे मागणीपत्र शासनास सादर केले होते. त्यापैकी दिनांक २० डिसेंबर २००८ च्या शासन निर्णयान्वये रुपये ५३,४०,८४,०००/- (रु.त्रेपन्न कोटी चाळीस लाख चौ-याऐंशी हजार फक्त) इतके अनुदान कंपनीस रोखीने प्राप्त झाले आहे. तदवत आता रक्कम रुपये २८,६८,९०,०००/- (रुपये अठ्ठावीस कोटी अडुसष्ट लक्ष नव्वद हजार फक्त) शासन निर्णयान्वये संदर्भ क्र.१ व्दारे रोखीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना प्राप्त झालेले आहेत.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, संबंधित जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने वीज देयकाच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधितानी जरुर ती कार्यवाही करावी.

सबब, कंपनीच्या मागणीनुसार संपूर्ण रक्कम प्राप्त झालेली असल्यामुळे व संबंधित सर्व ग्रामपंचायती ग्राहकांना समायोजित केल्यामुळे दि. ३१.३.२००९ अखेर वीज देयकापोटी रक्कम शिल्लक राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

विज देयकापोटी समायोजित करण्यात आलेल्या रकमेचे सन २००८-०९ च्या ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय- मुंबई -३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरीत पाठवावी.

सोबत :- वरीलप्रमाणे.

३०/०३

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर -**

१) संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना -**

१. सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालय, माहिती व उचित कार्यवाहीसाठी
२. मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा), म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, मुंबई.

**प्रत रवाना -**

१) सर्व अधिक्षक अभियंता, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित,
२) व्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), मुंबई.
३) सर्व कार्यकारी अभियंता, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित.
४) सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये
--- माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

D:\Vaze\Accts\accts Circular २४३२००९.doc

अर्थसंकल्पीय अनुदान सन २००८-२००९

३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० % अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत)(मागणी क्र. एल -५)

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. बीजीटी २६०८/प्र.क्र.४४९८ /पंरा-४(२२)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक- १३ मार्च , २००९.

वाचा :-१) शासन निर्णय , ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९५०/२२ दि . ३०.१.९०

२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. बीजीटी २६०८/प्र.क्र. ४४९८/पंरा -४ (२२ ) दिनांक २० डिसेंबर , २००८.

प्रस्तावना :-

ग्राम पंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात वित्त विभागाने एकूण रुपये १०६,८३,६८,०००/- ( रुपये एकशे सहा कोटी एक्क्याऐंशी लक्ष अडूसष्ट हजार फक्त ) इतक्या रक्कमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये १०६,८३,६८,०००/- (रुपये एकशे सहा कोटी एक्क्याऐंशी लक्ष अडूसष्ट हजार फक्त ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे.

२. सदर तरतूदीतून संदर्भाधीन शासन समक्रमांकाच्या दिनांक २० डिसेंबर , २००८ च्या शासन निर्णयान्वये मागील थकबाकीसह चालू वर्षी ग्रामपंचायतीमधील रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज देयके अदा करण्यासाठी तरतूद रक्कम रुपये ५३,४०,८४,०००/- ( रुपये त्रेपन्न कोटी चाळीस लक्ष चौ-याऐंशी हजार फक्त ) इतके अनुदान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनी मर्यादित, मुंबई यांना रोखीने धनादेश क्र. ३२३१४८ दिनांक ३१.१.२००९ अन्वये वितरित करण्यांत आली आहे .

३. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने पत्र क्र. मु. अ. ( वा ) / लेखा / दि. ब. पा. पु. क्र. ३७१७, दिनांक २ फेब्रुवारी, २००९ अन्वये सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात मागील थकबाकीसह ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची वीज देयकांचे रुपये ८२,०९,७४,०००/-(रुपये ब्याऐंशी कोटी नऊ लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त ) इतक्या रकमेचे सुधारित मागणीपत्र शासनास सादर केले आहे . त्यापैकी दिनांक २० डिसेंबर , २००८ च्या शासन निर्णयान्वये रुपये ५३,४०,८४,०००/- ( रुपये त्रेपन्न कोटी चाळीस लक्ष चौ-याऐंशी हजार फक्त ) इतके अनुदान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना रोखीने धनादेश क्र. ३२३१४८, दिनांक ३१.१.२००९ अन्वये वितरित करण्यात आली आहे . यास्तव आता या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतीमधील रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज देयके अदा करण्यासाठी रक्कम रुपये २८,६८,९०,०००/- (रुपये अठ्ठावीस कोटी अडुसष्ट लक्ष नव्वद हजार फक्त ) रोखीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाव्दारे कार्यासन अधिकारी , रोखशाखा, ग्राम विकास व जलसंधारण विभाग , मंत्रालय , मुंबई यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे . सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय , मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा धनादेश महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय , मुंबई येथून काढावयाचा आहे . श्री. गुरुनाथ सावंत , कार्यासन अधिकारी, रोख शाखा यांच्या सहीने तयार केलेले व श्री. मो. का. भोये ,उप सचिव ( आस्थापना ), ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक, अधिदान व लेखा कार्यालय , मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे .

४. सदर मंजूर रक्कम रुपये २८,६८,९०,०००/- (रुपये अठ्ठावीस कोटी अडुसष्ट लक्ष नव्वद हजार फक्त ) इतके अनुदान खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे .

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम त्यांनी या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा .

ब) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबईने ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा

परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावी. व त्याची एक प्रत शासनास पाठवावी. विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र. ३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

५. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून विशेष कार्य अधिकारी /उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

६. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत) (मागणी क्र. एल ५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

९. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारिक संदर्भ क्र. ११८/०८,अर्थ १७, दिनांक २०.८.२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्र. वि. पाटील )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.( ३ प्रती )

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी,

१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१ (५ प्रती)

२) व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.

३) मुख्य अभियंता ( वाणिज्य ) , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड (वाणिज्य विभाग) ५ वा मजला , अनंत काणेकर मार्ग , वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१ (५ प्रती )

४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

५) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-२ , नागपूर .

७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर

८).अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.

९) निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

१०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा , कोकण भवन , वाशी , नवी मुंबई

११) उप लेखा परिक्षक , नवी मुंबई , वाशी /पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर

१२) मुख्य अभियंता. विद्युत विभाग, महाराष्ट्र शासन , प्रशासकीय इमारत, ५१ रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर , मुंबई ४०० ०७१

१३) अवर सचिव ( उर्जा -३ ) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

१४) विभागीय आयुक्त (सर्व )

१५) मुख्य कार्यकारी अधिकारी. जिल्हा परिषद (सर्व)

१६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

१७) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत )

१८) कार्यासन अधिकारी. ग्राम विकास व जलसंधारण विभाग (वित्त -१. वित्त- ७. वित्त -८)

१९) [illegible] (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग.मंत्रालय, मुंबई.३२.

२०) [illegible] (अर्थसंकल्प १७ / व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.

२१) निवडनस्ती ,पंरा -४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

# विववरणपत्र

शासन निर्णय क्र., बीजीटी २६०८/प्र.क्र. ४४९८ /पंरा-४ (२२), दिनांक १३ मार्च, २००९ ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००,इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० %अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत) (मागणी क्र. एल -५)

( रु. लाखात )

| अ. क्र. | जिल्हा | रुपये अंकात | रुपये अक्षरी |
|---|---|---|---|
| १ | २ | 3 | ४ |
| १ | ठाणे | -२६.१४ | (रुपये वजा सव्वीस लक्ष चौदा हजार फक्त ) |
| २ | रायगड | -२८.६३ | (रुपये वजा अठ्ठावीस लक्ष त्रेसष्ट हजार फक्त ) |
| ३ | रत्नागिरी | -३६.९३ | (रुपये वजा छत्तीस लक्ष त्र्याण्णव हजार फक्त ) |
| ४ | सिंधूदुर्ग | -३८.५७ | (रुपये वजा अडतीस लक्ष सत्तावन्न हजार फक्त ) |
| ५ | अहमदनगर | २१८.६२ | (रुपये दोन कोटी अठरा लक्ष बासष्ट हजार फक्त ) |
| ६ | धुळे | -१५.३० | (रुपये वजा पंधरा लक्ष तीस हजार फक्त ) |
| ७ | नंदूरबार | ११५.५५ | (रुपये एक कोटी पंधरा लक्ष पंचावन्न हजार फक्त ) |
| ८ | जळगांव | ३१.०७ | (रुपये एकतीस लक्ष सात हजार फक्त ) |
| ९ | नाशिक | १५५.५१ | (रुपये एक कोटी पंचावन्न लक्ष एकावन्न हजार फक्त ) |
| १० | कोल्हापूर | -१६३.२८ | (रुपये वजा एक कोटी त्रेसष्ट लक्ष अठ्ठावीस हजार फक्त ) |
| ११ | सांगली | -१४.२१ | (रुपये वजा चौदा लक्ष एकवीस हजार फक्त ) |
| १२ | सातारा | -१५४.४४ | (रुपये वजा एक कोटी चौपन्न लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त ) |
| १३ | सोलापूर | -१२७.१५ | (रुपये वजा एक कोटी सत्तावीस लक्ष पंधरा हजार फक्त ) |
| १४ | पुणे | १८७.३६ | (रुपये एक कोटी सत्त्याऐंशी लक्ष छत्तीस हजार फक्त ) |
| १५ | औरंगाबाद | २९२.४४ | (रुपये दोन कोटी ब्याण्णव लक्ष चव्वेचाळीस हजार फक्त ) |
| १६ | जालना | १४८.०३ | (रुपये एक कोटी अठ्ठेचाळीस लक्ष तीन हजार फक्त ) |
| १७ | परभणी | ३६७.६६ | (रुपये तीन कोटी सदुसष्ट लक्ष सहासष्ट हजार फक्त ) |
| १८ | हिंगोली | १७३.८२ | (रुपये एक कोटी त्र्याहत्तर लक्ष ब्याऐंशी हजार फक्त ) |
| १९ | बीड | ४३५.५० | (रुपये चार कोटी पस्तीस लक्ष पन्नास हजार फक्त) |
| २० | लातूर | ३५०.०३ | (रुपये तीन कोटी पन्नास लक्ष तीन हजार फक्त ) |
| २१ | नांदेड | ७८०.४० | (रुपये सात कोटी ऐंशी लक्ष चाळीस हजार फक्त ) |
| २२ | उस्मानाबाद | १६४.९० | (रुपये एक कोटी चौसष्ट लक्ष नव्वद हजार फक्त ) |
| २३ | अकोला | -१७२.५३ | (रुपये वजा एक कोटी बाहत्तर लक्ष त्रेपन्न हजार फक्त ) ) |
| २४ | वाशिम | -१६८.२८ | (रुपये वजा एक कोटी अडुसष्ट लक्ष अठ्ठावीस हजार फक्त ) |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | अमरावती | -७५.१२ | (रुपये वजा पंच्च्याहत्तर लक्ष बारा हजार फक्त ) |
| २६ | बुलढाणा | -८६.१८ | (रुपये वजा शहाऐंशी लक्ष अठरा हजार फक्त ) |
| २७ | यवतमाळ | १३७.४६ | (रुपये एक कोटी सदतीस लक्ष शेहेचाळीस हजार फक्त ) |
| २८ | भंडारा | ६७.२० | (रुपये सदुसष्ट लक्ष वीस हजार फक्त ) |
| २९ | गोंदिया | -०.४५ | (रुपये वजा पंचेचाळीस हजार फक्त ) |
| ३० | चंद्रपूर | ६.९३ | (रुपये सहा लक्ष त्र्याण्णव हजार फक्त ) |
| ३१ | गडचिरोली | १४९.०० | (रुपये एक कोटी एकोणपन्नास लक्ष फक्त ) |
| ३२ | वर्धा | ५४.६० | (रुपये चौपन्न लक्ष साठ हजार फक्त ) |
| ३३ | नागपूर | १४०.०३ | (रुपये एक कोटी चाळीस लक्ष तीन हजार फक्त ) |
| | सर्व एकूण | २८६८.९० | (रुपये अठ्ठावीस कोटी अडुसष्ट लक्ष नव्वद हजार फक्त ) |

(प्र. वि. पाटील)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन